क्रमांक : २८

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग-दोन

**मंगळवार, दिनांक ११ जून, २०२४/ज्येष्ठ २१ १९४६ (शके)**

**संदर्भ:** पत्रक भाग दोन कमांक २७, दिनांकित ८ एप्रिल,२०२४.

**३२.** निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, लोकसभेच्या २०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने लागू केलेली आचारसंहिता विचारात घेऊन, मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना दिनांक १६ मार्च, २०२४ ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रवासाकरिता रेल्वे कुपन पुस्तकांचा वापर, राज्य मार्ग परिवहन वा अन्य परिवहन सेवांद्वारे मोफत प्रवास व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ च्या कलम ५ (१-अ) नुसार विमान प्रवास या सुविधा अनुज्ञेय राहणार नाहीत, असे संदर्भाधीन पत्रक भाग-२ द्वारे कळविण्यात आले होते.

आता भारत निवडणूक आयोग यांनी दिनांक ६ जून, २०२४ रोजीच्या पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे: "Now, that the results in respect of the General Elections to the House of the People (Lok sabha), 2024 and State Legislative Assemblies in the state of Andhra Pradesh, Arunachal Pradesh, Odisha and Sikkim and certain bye Election have been declared by the respective Returning Officers, the Model Code of Conduct has ceased to be in operation with immediate effect except in the Graduates and Teachers Constituencies of Karnataka, Maharshtra and Telangana where Model Code of conduct is in force due to biennial/ bye election to Legislative Council from Graduates and Teachers Constituencies."

अत: निवडणूक आयोगाच्या उपरोक्त पत्राच्या अधीन राहून यापुढे मा. सदस्यांना रेल्वे प्रवासासाठीच्या कुपन सुविधेचा वापर अनुज्ञेय राहील.

**जितेंद्र भोळे**
सचिव-१ (का)
महाराष्ट्र विधानसभा

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : ११ जून, २०२४

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये
४) निवडनस्ती

\\Mls-h2-06\J\D -1\2024\ACHARSAHITA NOTE & PATRAK BHAG-2 MARCH 2019 RAILWAY DEPARTMENT\PATRAK BHAG-2 ELECTION 2019.docx